**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री एस.आर.कुलकर्णी यांचे मार्फत सुरुः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देते की,

माझे नावः – आस्मीता अमित बिरादार,

वय – ३६ वर्षे, व्यवसाय – घरकाम,

राहणार – रा.वळसांगवी, ता. निलंगा जि. लातूर.

मी आरोपी क्र.१ माझे पती, आरोपी क्र.२ ही माझी सासु, आरोपी क्र.३ ते ५ या माझ्या नणंदा आहेत. माझे आरोपी क्र.१ सोबत लग्न दि.३१/०५/२०१९ रोजी झाले. लग्नानंतर मी पुणे येथे नांदायला गेले. त्यानंतर आरोपी क्र.१ ते ५ यांनी सुरुवातीला चांगले नांदवले. त्यानंतर माझे व माझ्या पतीचे पटत नव्हते. किरकोळ भांडण होत होते. त्यामुळे मी महिला तक्रार निवारण केंद्र येथे तक्रार दिली व त्यानंतर पोलीस स्टेशन येथे जबाब दिला. आता मला तो जबाब दाखवण्यात आला. त्यातील मजकुर मला माहीत नाही. परंतु त्यावर माझ्झी सही आहे. त्यामुळे सहीस ओळखीपुरता **नि.क्र.३६** देण्यात येतो.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.

०२. साक्षीदारास अधोरेखांकीत भाग अ वाचून दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, अधोरेखीत भाग अ प्रमाणे घटना घडलेली आहे. हे म्हणणे

खरे आहे की, माझ्या व आरोपीमधील वाद मिटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या सांगण्यावरुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे अॅड.एन.डी.मेहेत्रे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.08.07 17:26:26 +0530

(**श्रीमती.के.पी.गाडे**)

दिनांक–०७/०८/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र.२), निलंगा